ISSN 2231-5063 IMPACT FACTOR : 3.4052(UIF) | VOLUME-4 | ISSUE-9 | MARCH-2015

GOLDEN RESEARCH THOUGHTS

एकविसाव्या शतकात राष्ट्रसंताच्या विचारांची आवश्यकता

रवींद्र देविदासराव डाखोरे

मराठी विभाग प्रमुख गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
चांदूरबाजार जि. अमरावती

सारांश :

- महाराष्ट्र ही विरांची भूमी आहे. तशीच ती थोर संताचीही आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास यासारखे थोर पुरूष या भूमीत होऊन गेले. आपल्या वाणीने, लेखणीने व कार्याने या संतानी समाजात जागृती केली. त्याला असत्यातून सत्याकडे अज्ञानातून ज्ञानाकडे अंधःकारातून प्रकाशाकडे अंधश्रध्देतून वास्तविकतेकडे नेण्याचे महान कार्य या संतानी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे स्वतंत्र बाण्याचे समाजसुधारक व समाजचिंतक होते. भारतीय समाजाच्या उत्कर्षाची त्यांना तळमळ होती. धर्म, पंथ जाती यांच्यातील भेदमूलक भिंती ढासळून जाव्यात अनिष्ठ रूढी, परंपरा उच्छेद करून समाजजीवन उन्नत व्हावे यासाठी ते आयुष्यभर झटले.

सर्व प्राणीमात्र ही एकाच ईश्वराची लेकरे असून त्यांनी गुण्यागोविंदाने नादांवे समाज जीवनात परस्पर प्रेमाचे, सहानुभूतीचे व सहकार्याचे वातावरण निर्माण व्हावे प्रत्येक व्यक्ती व गाव स्वावलंबी व्हावा असे त्यांचे स्वप्न होते. एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदात्तीकरण यांनी सर्व जगाला व्यापून टाकले आहे. या सर्वामुळे ग्रामीण भागातील वातावरण मोठे भयावह बनले आहे. ग्रामीण माणसाचे जगणे अवघड झाले आहे. अशा जगणे नकोसे झालेल्या माणसाला भयभीत झालेल्या माणसाला एकंदरीत सर्व भारतीय जनतेला सुख समृध्दी पाहिजे असेल तर एकविसाव्या शतकात राष्ट्रसंताच्या विचारांची अत्यंत गरज आहे.

प्रस्तावना

वर्तमान काळातील सामाजिक जीवनात परस्पराचे सुदृढ असे संबंध नसल्याचे दिसते. जो तो आपआपल्या व्यक्तिगत विचारात गुतंलेला आहे. त्यामुळे सामाजिक भावना लुप्त होत आहे. अशा समाज माणसास योग्य मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारात आहे.

राष्ट्रसंतानी कुटुंब, ग्राम, समाज, धर्म, देश अशा विविध विषयावर विचार मांडले आणि अशा सर्व घटकांना एकत्र आणून समर्थ भारताचे स्वप्न लोकांपुढे मांडले. आज विकसित भारताच्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. विकसनशील अवस्थेकडून विकसित अवस्थेकडे जाणारी आपली अर्थव्यवस्था ही तशी शहरापुरती मर्यादीत दिसते. पण खरा भारत गावात वसतो. त्यातील प्रश्न त्यावरील उपाय आणि त्यातून समर्थ भारताची उभारणी ही दृष्टी राष्ट्रसंतानी दिली. राष्ट्रसंताचा वैज्ञानिक दृष्ट्रीकोन त्यांच्या विचारातून स्पष्टपणे दिसतो. सामान्य जनांना विज्ञान तांत्रिक भाषेत समजावून सांगितले तर लक्षात येत नाही किंवा ते आत्मसात करणे कठिण असते म्हणून त्यांनी मानवी श्रध्दा आणि विज्ञान यांचा संबंध जोडला. गोवंशा बाबत त्यांचे विचार हे शुध्द वस्तुनिष्ठ आहे. ग्राम माणसात गाई विषयी असलेली श्रध्दा आणि मानवी जीवनास उपयुक्त असलेले दुग्धजन्य पदार्थ व त्याचा उपयोग यांचा संबंध जोडून गोवंशा बाबत विचार मांडले. त्यासोबतच खत कसे तयार करावे त्याचा कसा वापर करावा याबाबत त्यांनी केलेले विवेचन वस्तुनिष्ठ आहे. त्यांचे विचार लोकांनी आत्मसात केले कारण ते श्रध्देच्या अंतरंगातून लोकात एकरूप झाले. समाज स्वास्थाचेही महत्व त्यांनी विशद केले आहे. कुंटुबाचे स्वरूप कसे असावे त्यातील नाते संबंध कसे असावे याचा सूक्ष्म विचार त्यांनी केला आहे. वर्तमान कुंटुब व्यवस्थेत ताणतणाव वाढताना दिसतात. एकत्र कुंटुब प्रणाली जाऊन विभक्त कुंटुब प्रणाली अस्तित्वात आली. त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. राष्ट्रसंतानी या सगळया समस्येचे विवेचन त्यावरील उपाय योजन सांगितलेल्या आहेत. राष्ट्रसंत व्यवसायाबाबत विचार करतान म्हणतात

उद्योग यंत्रे ही निर्मावी । परदेशा भीक न मागावी ।।
आपणची करोनी भोगावी । वैभवे सारी ।

वर्तमानात जर भारताची आयात बघितली तर आपली परकीय गंगाजळी कमी होण्यास आयात हाच महत्वपूर्ण घटक होय हे लक्षात येईल. त्याचा परिणाम रूपायावर होतो. त्याचे मूल्य घटत जाते पर्यायाने भाव वाढीस सामोरे जावे लागते. स्वदेशी वस्तुचा वापर स्वदेशात उत्पादन वाढले तर रोजगार वाढेल. भाव वाढ होणार नाही. बेरोजगारीचा प्रश्न कमी होण्यास मदत होईल. असे विविध फायदे स्वदेशीचे आहे. याबाबत त्यावेळेस राष्ट्रसंतानी विचार केला आणि उपाय योजना सुचविल्या दूरदृष्टी असावी तर अशी स्वराज्याचे व सुराज्याचे यथोचित भान ठेऊन ग्रामोन्नतीसाठी तळमळीने झटणारे तुकडोजी महाराज हे खरेखुरे राष्ट्रसंत होते. राष्ट्रसंतानी परखडपणे आपले विचार मांडले आहे. एखादा व्यक्ती जर ग्राम विकासाच्या आड येत असेल तर त्याला समजावून सांगितल्यावरही तो ऐकत नसेल तर काय करावे याविषयी ते म्हणतात

म्हणोनी बहिष्कार, असहकार । करोनी त्याचे तोडावे आधार ।
नाक दाबता तोंड सत्वर । उघडो लागे ।

राष्ट्रसंतानी आपल्या विचारातून मानवी जीवन मूल्यसंवर्धन सांस्कृतिक सामाजिक जीवन, निसर्ग, शेती, पशू अशा सर्वाचा परामर्ष घेतला. त्यांचे विचार कालातीत आहे. जोपर्यंत माणूस आहे. तोपर्यंत मानवी समस्या राहणारचं आणि कोणत्याही काळी त्यावरील उपाय शोधने गरजेचे राहील. अशा वेळेस राष्ट्रसंतानी मांडलेले विचार त्यांनी दाखवलेला मार्ग एकविसाव्या शतकात निश्चित उपयुक्त राहील कारण त्यांचे विचार हे वास्तवावर आधारीत आहे. मानवी मनातील भावभावनेचा वापर करून त्याचा विकास करणे याचा समाजशास्त्रीय अंगाने विचार केला तर राष्ट्रसंतानी निवडलेला समाज सुधारणेचा मार्ग हा लोकमनाला साद घालणारा आहे. हे कळून येते. तसेच मानवी मनाला कसे वळविता येईल व त्याची शक्ती कशा प्रकारे योग्य मार्गाला लावावी याबाबत त्यांनी केलेले कार्य संशोधनाचा विषय आहे. समुह मानसिकता कशा प्रकारे ओळखावी आणि कशा मार्गाने सामुहिक कार्य करावे याबाबतचा अभ्यास राष्ट्रसंताच्या कार्यातून, विचारातून होऊ शकतो.

संशोधन पध्दती :

ग्रामीण जीवनातील वास्तव याबाबतची माहिती व या माहितीचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक असे वर्गीकरण करून बदलत जाणारी समाज व्यवस्था त्यात निर्माण होणा–या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक समस्या व राष्ट्रसंताचे विचार यांची सांगड घातली आहे. म्हणून सदर संशोधनासाठी समाजशास्त्रीय व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधन समस्या :

वर्तमान काळातील जागतिकीकरणाच्या या वेगवान जीवन प्रणालीत ग्रामीण माणूस हा संभ्रमित असलेला दिसतो. आपल्या चांगल्याचे काय आणि वाईटाचे काय याबाबत तो सांशक होत आहे. त्याच्या शेतीचे त्याच्या गावाचे भवितव्य काय हे त्याला कळत नाही अशी संभ्रमित अवस्था वर्तमान माणसाची झालेली आहे. अशी ही समस्या मानवी जीवनाचे भविष्य अंधकारमय करीत आहे. आपल्या जीवनावर आघात करणा–या या समस्येला उत्तर राष्ट्रसंताच्या विचारात निश्चित सापडते. या करीता त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्याच्या हेतूने हा विषय घेण्यात आला आहे.

निष्कर्ष :

राष्ट्रसंताचे विचार हे केवळ वारक–या पुरते मर्यादीत न राहता समाजातील खालच्या स्तरापर्यंत पाझरले पाहिजे. त्यांच्या वाङ्मयाचा आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये समावेश करून उदयाच्या भावी पिढीवर त्यांच्या विचाराचा संस्कार झाल्यास एकविसाव्या शतकात भारत अधिक संपन्न होण्यास वेळ लागणार नाही. भविष्यामध्ये संस्कारयुक्त भारत पाहवयाचा असेल तर राष्ट्रसंताच्या साहित्यातून व्यक्त झालेले समाज सुधारणेचे विचार प्रत्येकाने आत्मसात केल्यास राष्ट्राचा विकास व भावी पिढीची सर्वांगीण उन्नती होणे शक्य होईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी भारतीय समाज हा काळया अंधार कोठडीतून सकाळच्या उजेडाच्या किरणाकडे घेऊन जाणारा विचार प्रवाह रूजविण्याचा प्रयत्न केला. त्याचे फलीत व्हायचे असल्यास त्यांच्या विचांराना आचरणाची गरज आहे.

संदर्भसूची :

1.ग्रामगीता, संपादन, सुदाम सावरकर, श्रीगुरूदेव प्रतिष्ठान, गुरूकुंज आश्रम, विसावी आवृत्ती 2010
2.ग्रामगीता गद्यसार, संपादन, प्रा. पी. जी. कदम, राजीव प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती 1984
3.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ति आणि वाङ्मय, संपादन, डॉ. अक्षयकुमार काळे, विसा बुक्स नागपूर प्रथम आवृत्ती 2008
4.राष्ट्रसंताची भाषणे – बाबा मोहोड
5.सद्विचार प्रवाह – श्रीसंत तुकडोजी